---

**रे.मु.नं. ९८/२०१७**
शिवराम **वि.** सुलाबाई

## निशाणी ५ खालिल आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादीने दावा मिळकत विक्री करू नये किंवा वादीच्या ताब्यात हरकत अडथळा करू नये अशा तुर्तातुर्त मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे.

**२.** वादीच्या कथनानुसार दावामिळकत ही मयत नामदेव मोरे यांना शासनाकडुन फेरफार क्र. ९४९ प्रमाणे मिळाली होती. वादी क्र. २ हा वादी क्र. १ चा मुलगा असुन प्रतिवादी क्र. २ ते ४ हे त्याचे चलुत भाऊ आहेत. प्रतिवादी क्र. १ ही वादी क्र. १ ची चुलती आहे. मयत नामदेव मोरे यांनी त्यांच्या हयातीमध्ये दावा मिळकतीपैकी ४० आर क्षेत्र घरगुती व प्रापंचिक अडचणीसाठी विक्री करणेस काढले वादी क्र. १ ने सदर मिळकत रूपये ५३,०००/— रक्कमेच्या मोबदल्यात खरेदी करण्याचे ठरवले त्याप्रमाणे दिनांक ०३/०७/२००० रोजी नोटरी करार झाला. तसेच दावा मिळकतीचा ताबा वादीला देण्यात आला. वादी क्र. २ यांना सदर दिवशी कुलमुखत्यारपत्र लिहुन देण्यात आले होते. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी उर्वरित ४१ आर क्षेत्र विक्री करण्याचे ठरऊन दिनांक २०/०२/२०१६ रोजी नोटरी करार करून दिला. वादीने कराराच्या रक्कमा प्रतिवादींना अदा केलेल्या आहेत. दावा मिळकत वादीच्या कब्जेवहिवाटीस असुन प्रतिवादींनी खरेदीखत करून देण्याचे टाळल्यामुळे व हरकत अडथळा केल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले.

.......................................................................................................................................

**३.** प्रतिवादी क्र.२ ने निशाणी १९ कडे नुसार दाव्यास कैफियत व अर्जास म्हणणे देऊन सर्व कथनांचा इनकार केला. प्रतिवादींच्या कथनानुसार दावा मिळकत यांच्या कब्जेवहिवाटीत असुन नामदेव मोरे मयत झाल्यानंतर फेरफार क्र. ४३१८ नुसार प्रतिवादींच्या नावांची नोंद ७/१२ पत्रकी झालेली आहे. प्रतिवादींच्या पुढील कथनाप्रमाणे त्यांनी वादीकडुन मयत नामदेव मोरे यांच्या आजारपणामध्ये रूपये ५३,०००/— हातउसणे घेतले होते. सदर बाबीचा फायदा घेऊन बनावट दस्त तयार करण्यात आला. वादीने प्रतिवादींना आर्थिक मदत रूपये ३,००,०००/— केली होती परंतु व्याजाची रक्कम जास्त मागणी केली. वादीने बेकायदेशीरपणे प्रतिवादींच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेऊन बनावट दस्त अस्तित्वात अणले असुन अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

**४.** प्रतिवादी क्र. १ , ३ व ४ यांनी निशाणी २१ कडे पुरसीस देऊन प्रतिवादी क्र. २ ने निशाणी १९ कडे दिलेली कैफियत मान्य केली.

**५.** वादीतर्फे श्री. कांबळे तर प्रतिवादी तर्फे श्री. आर.डी.शिंदे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. पुढील मद्दे उपस्थित होतात त्यांचे निष्कर्ष मी कारणांसहित खाली नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी यांनी सकृत दर्शनी केस शाबित केली आहे काय? | होय |
| २ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय? | होय |
| ३ | तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होईल काय? | होय |
| ४ | अंतिम आदेश कोणता? | अर्ज अंशत:मंजूर करण्यात येत आहे |

---

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबत :—**

**६.** वादीच्या कथनानुसार दावा मिळकत ही त्यांच्या कायदेशीर कब्जेवहिवाटीस असुन मयत नामदेव मोरे व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकत विक्री करण्याचे ठरऊन वादींना साठेखत व कुलमुखत्यारपत्र लिहुन दिले आहे. तसेच दावा मिळकतीचा ताबा दिल्याबाबत ताबा पावती लिहुन दिले आहे. प्रतिवादींच्या नावांची नोंद ७/१२ पत्रकी असुन ते मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. तसेच वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार मयत नामदेव मोरे यांनी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादी कडुन आर्थिक अडचणीसाठी रक्कम घ ेतली होती. परंतु कोणतेही दस्त लिहुन दिलेले नाही.

**७.** वादीने प्रस्तुत प्रकरणात निशाणी ३/१ कडे दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला असुन त्याप्रामणे प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या नावांची नोंद फेरफेर क्र. ४३१८ नुसार झाल्याची दिसुन येते. निशाणी ३/२ कडील कब्जेपावती नुसार मयत नामदेव मोरे यांना दावा मिळकतीचा ताबा देण्यात आला होता. निशाणी ३/४ कडील दिनांक ०३/०७/२००० रोजीच्या कराराप्रमाणे मयत नामदेव मोरे व प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीला दावा मिळकतीपैकी ४० आर क्षेत्र विक्री करण्याचे ठरऊन करार करून दिला. तसेच मयत नामदेव मोरे यांनी वादी क्र. १ च्या नावे कुलमुखत्यारपत्र करून दिले होते. निशाणी ३/५ कडील दिनांक २४/११/२०११ रोजीच्या कुलमुखत्यार पत्रानुसार प्रतिवादी क्र. १ ते ४

---

यांनी वादी क्र. १ च्या नावे कुलमुखत्यारपत्र करून दिल्याचे दिसुन येते. सदर दस्त नोंदणीकृत आहे. तसेच निशाणी ३/६ कडील दिनांक १७/१२/२०१५ रोजीच्या करारनाम्यानुसार प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी ४१ आर क्षेत्र विक्री करण्याचे ठरऊन वादीला करार करून दिला. निशाणी ३/७ कडील दिनांक २३/०७/२०१६ रोजीच्या नोटीसप्रमाणे वादीने करारपुर्ती करून मागीतले असता खरेदीखत करून देण्यात आलेले नाही असे दिसुन येते.

८. प्रतिवादींच्या कथनांच्या विचार करता त्यांनी कोणताही दस्त करून दिला नाही. असा बचाव जरी घेतला असता तरी सुध्दा वादीकडुन रूपये ३,५३,०००/— स्विकारल्याचे मान्य केले आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार सदर रक्कम उसनवार म्हणुन घेण्यात आली होती. आजरोजी दावा मिळकत प्रतिवादींच्या नावे नोंद आहे. वादातील दस्तांबाबत पुरावा घंऊन निर्णय घेण्यास विलंब होणार आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीने दावा मिळकत विक्री केल्यास वादीचे अपरिमित नुकसान संभवते. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांवरून मयत नामदेव व प्रतिवादींनी वादींच्या हक्कात दावा मिळकत विक्री करण्यासाठी करार करून दिल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. वादीने दावा मिळकत त्याच्या कब्जेवहिवाटीस असल्याचे सांगितले परंतु त्याच्या कोणताही पुरावा दिलेला नाही. दावा मिळकत शासनाच्या पुर्व परवानगी शिवाय विक्री करता येत नाही व त्याचा ताबा सुध्दा देता येत नाही. वादीने दाखल केलेल्या नोटीसवरून प्रतिवादीकडे मागणी करून सुध्दा त्यांनी खरेदीखत करून दिले नाही हे स्पष्ट होते. सदर बाबींचा विचार करता सोयीचे समतोलत्व वादींचे बाजुने आहे.

---

**९.** उपलब्ध कागदपत्रांचा तसेच वाद कथनांचा विचार करता वादी हा केवळ दावा मिळकतीच्या संरक्षणासाठी मनाई हुकुम मिळणे पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदऊन मुद्दा क्र. ४ साठी पुढील आदेश देत आहे.

## **<u>आदेश</u>**

**१.** अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**२.** प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दाव्याचा निकाल लागेपावेतो दावा मिळकत कोणत्याही प्रकारे कोणत्याही इसमा मार्फत विक्री, तबदील व हस्तांतरीत करण्याची नाही अशी त्यांना तुर्तातुर्त मनाई करण्यात येते.

दौंड.
दिनांक :— ०१/०३/२०१८.

**( सुमित वि. जोशी )**
सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
दौंड

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word for word as per original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | : T.R.Bagwan |
| Court Name | : S.V. Joshi |
| | : Civil Judge Junior Division, Daund. |
| Date of Judgment | : 01.03.2018 |
| Judg. signed by P. O. | : 01.03.2018 |
| Uploaded on | : 31.03.2018 |